**राज्य क्रिडा व युवा धोरण २०१२ बाबतच्याकुलगुरुंच्या संयुक्त मंडळ उपसमितीच्या शिफारशींची अंमलबजावणी विद्यापीठे व महाविद्यालय स्तरावर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१३/प्र.क्र.२८९/विशि-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
तारीखः २५ जुलै ,२०१३.

**<u>वाचा :-</u>**

१) **शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः क्रिडाधो२०११/प्र.क्र.५५/११/क्रियुसे-१,दि.१४ जुन २०१२.**
२) **शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांकः युकधो२०११/प्र.क्र.४३/क्रियुसे-३, दि.१४ जुन २०१२.**
३) **शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०१२/प्र.क्र.१६१/क्रियुसे-३, दि.१० जानेवारी ,२०१३.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यात क्रिडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने राज्य क्रिडा व युवा धोरण २०१२ जाहिर केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी विद्यापीठे व महाविद्यालयात करण्याचा निर्णय मा. राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला आहे. या क्रिडा धोरणाच्या अनुषंगाने राज्य क्रिडा व युवा धोरण २०१२ याची विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी मा.मंत्री , उच्च व तंत्र शिक्षण विभाग व मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली दि.१० जानेवारी २०१३ च्या शासननिर्णयान्वये कुलगुरुंची संयुक्त मंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या उपसमितीने राज्य क्रिडा व युवा धोरण २०१२ याची अंमलबजावणी करण्याकरीता केलेल्या शिफारशींची विद्यापीठे व महाविद्यालय स्तरावरून अंमलबजावणी करणेबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

कुलगुरुंच्या संयुक्त मंडळ उपसमितीने राज्य क्रिडा व युवा धोरणासंदर्भात केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यास या शासन निर्णयाव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये पुढील बाबी समाविष्ट राहतील :-

१) <u>व्यापक आरोग्याकरीता स्तर :-</u>

कोल्हापूर विद्यापीठात पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणा-या १० गुणांसाठीच्या शारिरीक शिक्षण परिक्षेच्या योजनेचा विस्तार सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये पदवीच्या तीन्ही वर्षातील विद्यार्थ्यांकरीता करण्यात यावा.

२) **विद्यापीठे/ उपकेंद्रे/संलग्नीत महाविद्यालये यांनी शारिरीक शिक्षण क्रिडा सुविधा तयार करण्याकरीता :-**

अ) विद्यापीठे/उपकेंद्रे/ संलग्नीत महाविद्यालयांमध्ये खालील किमान गुणवत्तापूर्ण क्रिडा सुविधा विद्यापीठ निधीतून उभारण्यात याव्यात.

- **<u>विद्यापीठे</u>** :- ४०० मी ची कृत्रिम/ मातीची धावपट्टी, अंतगृही खेळांकरीता (Indoor Games) बहुउद्देशीय सभागृह, ऑलिंपीक मानकांप्रमाणे जलतरण तलाव, फुटबॉल व हॉकी करीता एकत्रित कृत्रिम मैदान, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल , कब्बडी, खो-खो, टेनिस, हॅण्डबॉल इत्यादी मैदानी खेळांकरीता मैदान आणि साधने.
- **<u>महाविद्यालये</u>** :- कार्यात्मक व्यायामशाळा, फुटबॉल,हॉकी ,बास्केटबॉल, व्हॉलीबॉल कबड्डी,खो-खो, टेनिस,हॅण्डबॉल इत्यादी मैदानी खेळांकरीता मैदान व टेबल टेनिस , बॅडमिंटन या अंतगृही (Indoor Games) खेळांकरीता सुविधा.

आ) वरील क्रिडा सुविधा असल्याची खातरजमा केल्यानंतरच नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्यात यावी.

इ) विद्यापीठांनी त्यांच्या निधीच्या १०% निधी क्रिडा सुविधा पुरविण्यासाठी खर्च करावा.

३) <u>राज्य विद्यापीठ क्रिडा मंडळाची निर्मिती करणे.</u>

विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये क्रिडा उपक्रमांच्या योजना आखण्याकरीता व कार्यान्वीत करण्याकरीता राज्य विद्यापीठ क्रिडा मंडळाची निर्मिती करावी (क्रिडा धोरण २०१२ नूसार).

४) <u>पदे निर्मितीबाबत</u> :-

अ) गरज नसलेल्या मंजूर पदांचे समर्पण करुन मंजूर पदांतर्गतच प्राधान्याने शारिरीक शिक्षण संचालक/ क्रिडा मार्गदर्शक या पदांची निर्मिती करवी.

आ) सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सुद्धा संचालक, शारिरीक शिक्षकांची नेमणूक करवी.

५) प्रत्येक विद्यापीठाने अभ्यासक्रमात आरोग्य शिक्षणाचा सामावेश करावा.

६) प्रत्येक विद्यापीठात युवक दिन, युवक आठवडा इत्यादी दिन/ आठवडे साजरे करणे बंधनकारक करावे.

७) प्रत्येक वर्षी युवक साहित्य शिखर परिषदेचे आयोजन करावे.

८) प्रत्येक विद्यापीठात युवक अदलाबदल/ देवाणघेवाण (Youth Exchange) कार्यक्रम बंधनकारक करावा.

९) प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्या निधीतून ५०० विदयार्थी क्षमतेचे युवकांकरीता वसतीगृह बांधावे.

१०) प्रत्येक विद्यापीठाने खेळाडूंकरीता प्रगतशील प्रशिक्षण (Advanced Training) शिबीरांचे आयोजन करावे.

११) शालेय शिक्षणादरम्यान भारतीय शालेय शिक्षण क्रिडा संघ, पंचायत राज युवा व क्रिडा अभियान (PYKKA) इत्यादी योजनांतर्गत आढळलेल्या प्रतिभावंत खेळाडूंच्या ओळखीसाठी विशिष्ट ओळख नंबर(UID आधार क्रमांक) आधारीत मार्गनिरीक्षण (Tracking) योजना विकसीत करावी.

१२) कौशल्य विकास हा विद्यापीठाच्या युवा धोरणाचा अविभाज्य भाग असावा. तसेच काही उत्तम क्रिडा सुविधा असलेल्या शाळा/ महाविद्यालयांचे व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमां (VTP॰s) मध्ये रुपांतर करावे, जेथे कमी कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविले जातील.

१३) विद्यापीठ व कॉलेजांमध्ये क्रिडा सुविधांचा विकास करण्यासाठी व्यापक आराखडा व वित्तीय संरचनेचा विकास करावा.

१४) विद्यापीठाला देण्यात येणारे शासन अनुदान क्रिडा सुविधांच्या निर्मितीशी संलग्न करावे.

सदर आदेश राज्य क्रिडा व युवा धोरण २०१२ बाबत कुलगुरुंच्या संयुक्त मंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी विद्यापीठे व महाविद्यालय स्तरावर करणेबाबत देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७२६११२५४४०२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Giradhar Kanade

Digitally signed by Pramod Giradhar Kanade
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pramod Giradhar Kanade
Date: 2013.07.26 11:37:55 +05'30'

**( प्रमोद गि. कानडे )**
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे,

४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
५. विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव, उ.व तं. शि. विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
९. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (विशि-३)